**विषय -तालुका स्तरावरील आठवडा सभेबाबत...**

जा.क्र.आस्था-2(3)/परिपत्रक/कावि-४१४/2019
सामान्य प्रशासन विभाग
सातारा जिल्हा परिषद सातारा
दिनांक -26/11/2019

**परिपत्रक**

या परिपत्रकाव्दारे कळविणेत येते की , मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील सन 2018-2019 या आर्थिक वर्षातील होणा-या तपासणीचे अनुषंगाने दिनांक 16/11/2019 रोजी सहायक प्रशासन अधिकारी/कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्या घेतेलेल्या आढावा सभेमध्ये तालुका स्तरावरील कार्यालय प्रमुखांकडून (उदा. बांधकाम/ लपा/ग्रा.पा./ आरोग्य/ शिक्षण इ. ) वेळेत माहिती उपलब्ध होत नसल्याने पंचायत समिती विकास गटातील एकत्रित माहिती विहित कालावधीत व संयुक्तीक सादर करणेस विलंब होत आहे . ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे.

सबब गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना सुचित करणेत येते की , पंचायत समिती स्तरावर सर्व कार्यालयप्रमुख व सहायक प्रशासन अधिकारी/कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांची प्रत्येक सोमवारी अथवा आठवडयाच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी आस्थापना व योजना बाबतचा अदयावत आढावा घेणेत यावा. तसेच सहायक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांनी सदर सभेच्या अनुषंगाने आस्थापना व योजना बाबतची अदयावत माहिती व आढावा सभेचा इतिवृत्तांत सभेच्या दुस-या दिवशी या कार्यालयाकडे ई-मेलव्दारे अथवा खास दुतामार्फत या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावा.

**(संजय भागवत)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रति

गटविकास अधिकारी (सर्व)
पंचायत समिती --------------------------

Scanned by CamScanner